# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १३४/२००७/ दिनांक : २०.१०.२००७

| | |
|---|---|
| १) श्री. अभिजित आनंदा पाटील,<br>मु.पो. उरूण–इस्लामपूर,<br>महादेवनगर, रत्नत्रय निवास, वाकळे यांचे घरा नजीक,<br>ता. वाळवा, जि सांगली, पिन–४१५ ४०९ | अपेलंट |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता(का) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली.<br><br>२) कार्यकारी अभियंता,<br>म.रा.विद्युंत वितरण कंपनी मर्यादित,<br>संवसु विभाग, ताकारी रोड, इस्लामपूर, जि. सांगली.<br><br>३) सहाय्यक अभियंता (संवसु).<br>म.रा.विद्युत वितरण कंपनी मर्यादित.<br>संवसु उपविभाग, इस्लामपूर क्र. २,<br>इस्लामपूर–४१५ ४०९ जिल्हा–सांगली<br><br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तर्फे | विरूध्द पक्षकार |

**कोरम :–** १) श्री. के.व्ही. पाटील, अध्यक्ष
२) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतूदीनुसार.

श्री. अभिजित आनंदा पाटील, रा. उरूण–इस्लामपूर, जिल्हा–सांगली यांनी आपल्या मालकीच्या ऐतवडे (बु.) येथील शेती पंपास नवीन वीज पुरवठा न मिळाल्याबाबत अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय, सांगली येथे विहित नमुन्यांत तक्रार दाखल केली होती. त्याकामी कक्षाने दि. ७–८–२००७ रोजी दिलेला निर्णय मान्य न झाल्यांने त्यांनी प्रस्तुतचे अपील मंचामध्ये दाखल केले आहे.

अपीलदारांच्या तक्रारीचे सर्वसाधारण स्वरूप खालील प्रमाणे असल्याचे दिसून येते.

श्री. पाटील यांनी त्यांच्या मालकीच्या ऐतवडे (बु.) येथील गट नं. १३९० मध्ये खोदलेल्या नवीन विहीरीवरील शेती पंपास वीज कनेक्शन मिळण्यासाठी वि.प. यांचेकडे दि. ४–६–२००५ रोजी मागणी केली होती. त्याकामी वि.प. यांनी दिलेल्या कोटेशननुसार तक्रारदार यांनी दि. १८–४–२००७ रोजी रक्कम अदा केली. तथापि वेळोवेळी पाठपुरावा करूनही त्यांचे शेती पंपास अद्यापि वीज पुरवठा करण्यांत आलेला नाही.

प्रकरणी सुनावणीची तारीख २०–१०–२००७ रोजी विभागीय कार्यालय इस्लामपूर येथे नेमली होती. सदरचेवेळी तक्रारदार श्री. अभिजित पाटील हे स्वत: उपस्थित होते. वि.प. यांचे वतीने श्री. चव्हाण, कार्यकारी अभियंता, विभाग इस्लामपूर, श्री. बेडगकर, सहाय्यक अभियंता, उपविभाग इस्लामपूर क्र.२ हे उपस्थित होते. सुनावणीचेवेळी तक्रारदार श्री. पाटील यांनी असे सांगितले की त्यांनी ऐतवडे (बु.) येथील गट नं. १३९० मध्ये नवीन विहीर खोदली आहे. त्यासाठी त्यांनी बँकेचे कर्ज काढले होते. या विहिरीवरील शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी दि. ४–६–२००५ रोजी त्यांनी वि.प. कडे विहीत नमुन्यात अर्ज केला होता. त्यास अनुसरून वि.प. यांनी पाठविलेल्या कोटेशन प्रमाणे त्यांनी दि. १८–४–२००७ रोजी रू. १९८३/– चा भरणा केला आहे. तसेच दि. १७–७–२००७ रोजी चाचणी अहवालही सादर केला आहे. त्यानंतर त्यांनी सततचा पाठपुरावा करूनही त्यांना अद्याप वीज कनेक्शन मिळालेले नाही. श्री.पाटील यांनी पुढे असे सांगितले की त्यांना बँकेच्या व्याजापोटी रू. ५०,०००/– तसेच मानसिक शारीरिक त्रासाबद्‌दल रू. १०,०००/– अशी एकूण रू. ६०,०००/– नुकसान भरपाई मिळावी . त्याचप्रमाणे वीज कनेक्शनही विनाविलंब मिळावे.

वि.प. यांचेवतीने श्री. चव्हाण, कार्यकारी अभियंता, इस्लामपूर यांनी असे सांगितले की तक्रारदार यांच्या शेती पंपास वीज कनेक्शन देण्यासाठी वीज मंडळास ०.१२ एच.टी. लाईन टाकावी लागणार आहे. तसेच ०.२४ एल.टी. लाईन टाकावी लागणार आहे. शिवाय ६३ के.व्ही. रोहित्राची आवश्यकता आहे. अशी वस्तुस्थिती असली तरी पर्यायी योजना आखून तक्रारदार यांना लवकरांत लवकर वीज कनेक्शन कसे देता येईल याबाबतचे प्रयत्न चालू आहेत. श्री. चव्हाण, कार्यकारी अभियंता यांनी पुढे असे सांगितले की तक्रारदार यांनी दि. १७–७–२००७ रोजी सादर केलेल्या चांचणी अहवालास अनुसरून दि. ३०–७–२००७ रोजी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी (spot inspection) केली असता वीज कनेक्शन देण्यासाठी आवश्यक असलेली विजेची मोटार, कपॅसिटर, मेन स्वीच, E.L.C.B. इ. पैकी एकही साहित्य त्या ठिकाणी दिसून आले नाही. त्यांनी तक्रारदाराकडे अधिक चौकशी केली असतां इसम मजकूर यांनी सदरचे सर्व साहित्य अद्यापि विकत घेतलेले नाही असे सांगितले. यावरून तक्रारदाराने दि. १७–७–२००७ रोजी सादर केलेला चांचणी अहवाल वस्तुस्थितीस धरून नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. S.P.A. स्कीमखाली तक्रारदार यांच्या शेत पंपास वीज कनेक्शन मंजूर करण्यात आलेले आहे. त्यानुसार त्यांना विनाविलंब कोटेशन देण्यांत आले आहे त्यानंतर तक्रारदार यांनी रू. १९८३/– चा भरणा वि.प.कडे केला आहे. या शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वि.प.कडून आवश्यक ती उपाययोजना करण्याचे काम चालू आहे. त्यासाठी कांही कालावधी लागणार आहे. त्या दरम्यान तक्रारदार यांनी वीज कनेक्शनसाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदी करून जागेवर पहाणीसाठी उपलब्ध करणे आवश्यक आहे. श्री. चव्हाण, कार्यकारी अभियंता यांनी शेवटी असे सांगितले की तक्रारदार यांचे शेती पंपास वीज पुरवठा करण्यासाठी वि.प.कडून अनावश्यक विलंब झालेला नाही. त्यामुळे तक्रारदार यांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. सबब इसम मजकूर यांची सदरची मागणी फेटाळण्यात यावी.

सुनावणीचेवेळी तक्रारदार तसेच वि.प. यांनी केलेले कथन, उपलब्ध कागदपत्रे यांचा विचार करतां प्रकरणी खालील प्रमाणे परिस्थिती असल्याचे दिसून येते.

श्री. अभिजित आनंदा पाटील, रा. उरूण–इस्लामपूर, जिल्हा–सांगली, यांनी आपल्या मालकीच्या ऐतवडे (बु.) येथील गट नं १३९० मध्ये खोदलेल्या नवीन विहिरीवरील शेती पंपास वीज कनेक्शन मिळण्यासाठी दि. ४–६–२००५ रोजी वि.प.कडे अर्ज केला होता. सदरचे कनेक्शनला S.P.A. योजनेखली मंजुरी मिळाल्यानंतर वि.प. यांनी तक्रारदारास दि. ९–४–२००७ रोजी कोटेशन पाठविले. त्यानुसार श्री. पाटील यांनी दि. १८–४–२००७ रोजी रक्कम रू. १९८३/– चा भरणा केला. त्यानंतर त्यांनी दि. १७–७–२००७ रोजी चांचणी अहवाल सादर केला. त्याकामी वि.प. यांच्या निदर्शनास कांही त्रुटी आल्याचे दिसून येते. सदरच्या तांत्रीक त्रूटीची पूर्तता ग्राहकाकडून करून घ्यावी. तसेच ग्राहकाने शेती पंपास नवीन वीज पुरवठा करण्यासाठी केलेला अर्ज विद्युत पुरवठा संहितेनुसार पूर्ण करून घ्यावा व ग्राहकाने खोदलेल्या विहीरीसाठी कर्ज काढल्याची बाब व वीज कनेक्शनची निकड विचारांत घेऊन त्यांना वीज कनेक्शन देण्याचे करावे असे मंचाचे मत आहे. ग्राहकाने आपल्या शेती पंपास वीज कनेक्शन मिळण्याचे कामी आवश्यक जबाबदारी पार न पाडल्याने त्यांना वीज कनेक्शन देण्यास वि. प. यांनी तथाकथित विलंब लवल्याचे कारणावरून ग्राहकाने नुकसान भरपाई मिळण्याबाबतची केलेली मागणी फेटाळण्यांत येत आहे. त्यास अनुसरून मंच खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. अपीलदार श्री. पाटील यांनी वरील प्रमाणे पूर्तता केल्यानंतर वि. प. यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ चे तरतुदीनुसार वि.प. यांनी ग्राहकाचे शेती पंपास तीन महिन्याचे मुदतीत विद्युत पुरवठा करावा.

२. सदरच्या आदेशाची अंमलबजावणी करून तसे केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ चे कलम ८.७ चे तरतूदीनुसार वि. प. यांनी मंचास दि.१५.२.२००८ पर्यंत कळवावे.

३. या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असल्यास त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आत मा. विद्युत लोकपाल "केशवा" बांद्रा–कुर्ला कॉम्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–४०००५१यांचेकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर

( के. व्ही. पाटील )
अध्यक्ष
ग्रा.त.नि.मंच,कोप,कोल्हापूर